साप्ताहिक
# अनंत विचार
भारत सरकार मान्यताप्राप्त
संपादक : सचिन हरी आदापुरे
मो.नं.९८५००२७६४३

WEEKLY
ANANT VICHAR
वेब पोर्टल
युट्युब न्यूज नेटवर्क
Editor : SACHIN HARI ADAPURE
CELL NO - 9850027643
nageshadapure1978@gmail.com
अनंत विचार चा अंक WHATSAPP वर वाचण्यासाठी आपला WHATSAPP नंबर व नांव वरील नंबरवर SMS करावा

वर्ष : दुसरे | वार:मंगळवार | दि.३० एप्रिल २०२४ | किंमत : ५ रुपये | पाने : ४ | अंक: ३९ | R.N.I.No.-MAH-MAR-2022/83591 | PPR/83/2023-2025

## नकली शिवसेना असायला, ती तुमची डिग्री नाही

### उद्धव ठाकरे यांचा पलटवार

साप्ताहिक अनंत विचार वृत्त

सोलापुर – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नकली शिवसेना म्हणून केलेल्या टीकेचा शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी खरपूस समाचार घेतला. शिवसेना नकली असायला ती काय तुमची डिग्री आहे का? अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी मोदी यांच्यावर पलटवार केला. ते सोलापुरात महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ आयोजित कर्णिक नगर येथील सभेत बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सोलापूर लोकसभा म तदारसंघांच्या उमेदवार प्रणिती शिंदे, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्यास महाविकास आघाडीतील मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सोमवारी दुपारी सोलापुरातील होम मैदानावर जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना मोदी यांनी उद्धव ठाकरे यांची शिवसेना ही नकली असल्याची टीका केली होती. त्यावरून उद्धव ठाकरे यांनी मोदी यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली.

ठाकरे पुढे म्हणाले की, भाजपकडून ४०० पारचा नारा दिला जात आहे. परंतु त्यांना देशाची घटना बदलायची आहे. कारण त्यांना दलितांविषयी एक प्रकारचा आकस आहे. एका सामान्य कुटूंबातून आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहलेल्या घटनेवर देश चालवायचा का अशी भावना भाजपच्या मनात आहे. तसेच पंतप्रधान मोदी यांना वाटते की, मी एवढे प्रयत्न करतो. तरी जनता मला देव मानत नाही. मात्र जनता डॉ. बाबासाहेब यांना देव मानते. हे खरे मोदींचे दुखणे असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.



यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मी टरबूज, फडतूस, कलंक असा उल्लेख करणार नाही कारण ते त्यांना झोंबत, असा टोला देखील त्यांनी यावेळी लगावला. तसेच निवडणुकीच्या प्रचारादरम्यान, फडणवीस यांनी कोरोना काळात नरेंद्र मोदी यांनी देशाला लस देऊन सर्वाचे प्राण वाचवले. त्याचे आभार म्हणून मोदींना मत द्या, असे आवाहन केले होते.

दरम्यान, प्रणिती शिंदे यांना येत्या ७ मे रोजी हाताच्या चिन्हासमोरील बटण दाबून प्रचंड बहुतमाने विजयी करा. त्या विजयी सभेसाठी मी ४ जून रोजी पुन्हा एकदा सोलापुरात येईन, असे आश्वासन देखील ठाकरे यांनी यावेळी बोलताना दिले.

या जाहीर सभेप्रसंगी शिवसेना संपर्क प्रमुख अनिल कोकीळ, शिवसेना नेते मि लिंद नार्वेकर, उपनेते अस्मिता गायकवाड, प्रवक्ते शरद कोळी, समन्वयक पुरुषोत्तम बरडे, शिवसेना जिल्हा प्रमुख अजय दासरी, गणेश दादा वानकर, अमर पाटील, संभाजी शिंदे, धनंजय डीकोळे, उमेश सारंग, प्रताप चव्हाण, दत्ता गणेशकर, दत्ता माने, कम्युनिस्ट पार्टीचे माजी आमदार नरसय्या आडम मास्तर, निवडणूक प्रमुख माजी आमदार प्रकाश यलगुलवार काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे, बाबा मिस्त्री, राष्ट्रवादीचे अध्यक्ष सुधीर खरटमल, माजी महापौर महेश कोठे, आदी उपस्थित होते.

## सोलापूरकरांनी भाजपाच्या माध्यमातून विकासाच्या गॅरंटीला निवडावे

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सोलापूरकरांना आवाहन :

साप्ताहिक अनंत विचार वृत्त

**सोलापूर** – सोलापूरच्या समृद्धीसाठी सोलापूरला खूप काही देण्याची इच्छा आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत सोलापूरकरांनी भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या माध्यमातून सोलापूरकरांनी विकासाच्या गॅरंटीला निवडावे, असे आवाहन भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अतिविराट जाहीर सभा सोमवारी होम मैदानावर झाली. अत्यंत उत्साहपूर्ण आणि उत्स्फूर्तपणे हजारोंच्या संख्येने जमलेल्या जनसमुदायाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संबोधित केले. यावेळी व्यासपीठावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री गुलाबराव पाटील, खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते, माजी सहकारमंत्री आ. सुभाष देशमुख, माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. समाधान आवताडे, आ. यशवंत माने, आ. बबनराव शिंदे, आ. शहाजी पाटील, आ. संजय शिंदे, आ. जयकुमार गोरे, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार नरसिंग मेंगजी, माजी आमदार राजन पाटील, रश्मी बागल, राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील, भाजपाचे लोकसभा निवडणूक प्रमुख विक्रम देशमुख, माजी महापौर किशोर देशपांडे, भाजपाचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, भाजपाचे प्रदेश निमंत्रित सदस्य उदयशंकर पाटील, माजी महापौर शोभा बनशेट्टी, प्रणव परिचारक, भाजपचे सरचिटणीस रोहिणी तडवळकर, मनीष देशमुख, विशाल गायकवाड,



विकास वाघमारे, चन्नवीर चिट्टे, भाजपचे कार्यकारणी सदस्य शहाजी पवार, शिवानंद पाटील, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत, शिवसेना राज्य प्रवक्त्या डॉ. ज्योती वाघमारे, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे आनंद चंदनशिवे, रिपाइं (ए) चे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे, विनायक महिंद्रकर आदी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, कलंकित इतिहासानंतरही काँग्रेस पुन्हा सत्तेत येण्याचे स्वप्न पाहत आहे. काँग्रेसने देशाला भ्रष्टाचार, दहशतवाद, कुशासनात ढकलले होते. जनतेने १० वर्षांचा मोदी सरकारचा सेवा काल पाहिला आहे. जी विकास कामे काँग्रेस ६० वर्षात करू शकली नाही, ती विकासकामे भाजप सरकारने १० वर्षात करून दाखवली. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी या घटकांच्या प्रगतीला रोखण्याचा प्रयत्न काँग्रेसने केला. त्यांच्या मतांचा फक्त वापर केला गेला. मात्र भाजप सरकारने गेल्या १० वर्षात खऱ्या सामाजिक न्यायासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले. ओबीसी आयोगाला संविधानिक दर्जा, मेडिकल परीक्षेत ओबीसी आरक्षण तसेच गरिबांना न्याय देण्यासाठी १० टक्के आरक्षणाची तरतूद भाजपा सरकारने केली. भाजप सरकार संविधान बदलणार आरक्षण हटविणार असा खोटा आरोप काँग्रेसकडून केला जातो. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले आरक्षण कोणीही संपवू शकत नाही. आरक्षणाला जितकी ताकद देऊ शकतो तितकी ताकद देण्याचे काम भाजप करेल. याउलट एस्सी आणि एसटीचे आरक्षण अल्पसंख्याकांना देण्याची काँग्रेसची मानसिकता दिसून येत आहे. ते आम्ही कधीही होऊ देणार नाही, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठणकावून सांगितले.

जर वृत्ती चांगली असेल तर परिणाम ही चांगले येतात. आमदार राम सातपुते हे लोकसभेत गेल्यानंतर सोलापूरच्या विकासाची कामे करतील. सोलापूरकरांनी कमळाचे बटन दाबले तर ते मत मला मिळेल. घराघरामध्ये जाऊन भाजप सरकारची कामे सांगावी आणि भाजपच्या पाठीशी उभे रहावे असे आवाहनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याप्रसंगी केले.

## महायुतीचे दोन्हीही उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील – मनसे नेते दिलीप बापू धोत्रे

**पंढरपूर** – काँग्रेस सरकारच्या साठ वर्षांमध्ये काँग्रेसने फक्त प्रस्थापित लोकांचं भलं केलेले आहे. देशातील ८०% विस्थापितांना त्यांनी आजपर्यंत न्याय दिलेला नाही. विस्थापितांचे भलं करण्यासाठी,कल्याण करण्यासाठी त्यांची आर्थिक प्रगती करण्यासाठी भाजपाचे सरकार सत्तेवर येणे गरजेचे आहे.

भाजपा सरकारच्या दहा वर्षाच्या कालावधीमध्ये भ्रष्टाचार, जातीय दंगली, बॉम्बस्फोट, आर्थिक घोटाळे करणाऱ्यांवर अशा देशाला हानीकारक आणि जनतेला लुटू पाहणाऱ्या प्रस्थापित मंडळींवर कायद्याचा बडगा उभारला. तर हे काँग्रेस म्हणते आम्ही हुकूमशाही सुरू केली आहे. चुकीची कारवाई हे सरकार करत आहे. असे खोटेनाटे आरोप काँग्रेस सध्या निवडणुकीच्या प्रचारद्वारांमध्ये करत आहे. असा आरोप आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी पंढरपूर येथील शिवतीर्थावर मनसेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या प्रचार सभेत केला. यावेळी व्यासपीठावर मनसे



नेते दिलीप धोत्रे, आमदार राम सातपुते यांच्या प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना मंत्री तानाजी सावंत म्हणाले की तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील नागरिकांना करवाढ केली जाणार नाही. जनतेला विश्वासात घेऊन पंढरपूरचा कॅरीडॉर केला जाईल असा विश्वास दिला. यावेळी त्यांनी भाजप सरकारच्या राजवटीमध्ये देशभरामध्ये असंख्य सुधारणा झाली असल्याचे सांगत. देशभरातील रस्ते त्याचप्रमाणे गोरगरीब कष्टकरी जनतेला आपल्या हक्काचे घर त्यांनी दिले आहे. ग्रामीण भागामध्ये वीज पुरवली आहे. जल संजीवनी च्या माध्यमातून देशभरातील प्रत्येक गावोगावी पिण्याचे पाण्याचे नियोजन केले आहे. गोरगरीब जनतेला मोफत धान्य हे उपलब्ध करून दिले आहे. आरोग्याची हमी दिली आहे. अशा अनेक कामे ही भाजपाच्या सरकारच्या राजवटीमध्ये झालेले आहेत. आणि या योजना सध्या सुरू आहे. आज पर्यंत काँग्रेसने लुटारुचे काम केले आहे. प्रस्थापित विरोधात विस्थापित अशी ही संघर्षाची लढाई सध्या सुरू आहे असे सांगितले.



## सागर पडगळ यांच्या विवाह सोहळ्यास शरद पवार यांची उपस्थिती

साप्ताहिक अनंत विचार वृत्त

पंढरपूर – दिनांक २६/४/२०२४ रोजी श्रीराम मंगल कार्यालय पंढरपूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे विद्यार्थी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सागर पडगळ यांच्या विवाह सोहळा संपन्न झाला.

या विवाह सोहळ्यास देशाचे नेते खासदार शरद पवार, माढ्याचे लोकसभेचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील व पदाधिकारी या विवाह सोहळ्यात वधू वरास आशीर्वाद देण्यासाठी आवर्जून उपस्थित होते. यावेळी दोन्ही परिवाराच्या वतीने त्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आले. उपस्थित राहिल्याबद्दल मनापासून आभार मानून धन्यवाद देण्यात आली.

# संपादकीय

## अवकाळी पावसाचा अडथळा

महाराष्ट्र राज्यात काही जिल्ह्यांत अवकाळी पावसामुळे भाजीपाला व फळ पिकांचे नुकसान झाले आहे. त्याचप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांना भाजावळ करण्यात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. एकीकडे अवकाळी पावसामुळे हातातोंडाला आलेल्या पिकांचे नुकसान तर झाले, त्याचबरोबर जमिनीमध्ये पीक उत्तम प्रकारे यावे यासाठी जमिनीची भाजावळ केली जाते. तीच कोपऱ्यात करण्यात आलेली भाजावळ भिजल्याने शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागत आहे. म्हणजे एक प्रकारे शेतकऱ्यांवर नैसर्गिक संकट आले असे म्हणता येईल. एक वेळ दुबार पेरणी करणे सोपे असले तरी दुबार भाजावळ करणे कठीण असते. अशा नैसर्गिक संकटाच्या वेळी शासनाने शेतकऱ्यांच्या मागे खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे. त्यामुळे भाजावळ पावसाच्या पाण्याने ओली झाली असेल, तर व्यवस्थित सुकवून पुन्हा भाजावळ करावी लागते. जर त्यानंतर ढगाळ वातावरण असेल तर भिजलेला पालापाचोळा कुजला जातो. त्यामुळे दुर्गंधी वाढून वातावरण दूषित होते. असे वातावरण आरोग्याला अपायकारक ठरू शकते. भाजावळ झाल्यानंतर भाजावळीची एकत्र केलेली राख वाहून गेली असेल, तर झाडाखालील पातेऱ्याची भाजावळ केली जाते. कारण जमिनीची मशागत करण्यापूर्वी भाजावळ केल्यास जमिनीची सुपीकता टिकून राहते. अशा वेळी राज्यातील कृषी तज्ज्ञांनी पुढे येणे आवश्यक आहे. पावसाळा सुरु झाल्यावर शेतीच्या बांधावर जाण्यापेक्षा सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना अशा संकटातून सावरले पाहिजे. म्हणजे शेतकरी शेतीची मशागत करताना अधिक जोमाने काम करतील. पिकाची पेरणी करणाऱ्या जमिनीची भाजावळ केल्याने जमिनीतील मागील पिकांचे मूळ नष्ट होते. जमीन भाजली जाते, त्यामुळे नांगरणी करताना जमीन भुसभुशीत होते. याचा परिणाम पावसाचे पाणी साठून राहून जमिनीत ओलावा निर्माण होतो. तसेच पेरलेले बियाणे सुद्धा लवकर रुजून यायला मदत होते. भाजावळ हा शब्द नवीन पिढीला परिचित वाटत नसला तरी शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा शब्द आहे. शेतीचे पीक उत्तम प्रकारे व्हायचे असेल, तर शेतकऱ्यांना शेत जमिनीची भाजावळ करावी लागते. त्यासाठी एप्रिल व मे महिना शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचा असतो. आता जरी आधुनिक पद्धतीने शेती करत असलो तर खेडोपाड्यात आजही पारंपरिक पद्धतीने शेती केली जाते. त्यामुळे ज्या कोपऱ्यात भात पेरायचे असेल त्या कोपऱ्यामध्ये भाजावळ केली जाते. त्यासाठी डिसेंबर महिन्यामध्ये कवळा तोडली जातात. कवळा म्हणजे झाडाच्या फांद्या तोडणे व तोडलेल्या फांद्या दिंड्याने एकत्र करून बांधणे म्हणजे ढ़कवळाफ होय. कोकणामध्ये ढ़कवळाफ हा परिचित शब्द आहे. महिन्यानंतर म्हणजे, ओली असणारी कवळा वाळल्यानंतर कोपऱ्याच्या एका बाजूला उभी करून ठेवली जातात. सध्या शेतकऱ्यांचा भाजावळीचा मोसम सुरु आहे. मात्र त्याला अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने वाळलेली कवळा भिजल्यामुळे पुन्हा एकदा शेतकरी राजा संकटात सापडला आहे. शेतीसाठी भाजावळ अतिशय महत्त्वाची असते. कोणत्याही पिकाचे शेतीतून उत्पादन घेण्यापूर्वी त्या जमिनीमध्ये भाजावळ करावी लागते. याचा परिणाम शेतीचे उत्पादन वाढण्याला मदत होत असते. त्याचप्रमाणे किडेमुंग्या नष्ट होतात. याचा परिणाम पिकाची चांगल्या प्रकारे वाढ होते. वाढ झाल्याने उत्पादन सुद्धा वाढण्याला मदत होऊन शेतकऱ्यांना अधिक चार पैसे मिळण्याला मदत होते. याचा चांगला परिणाम शेतकऱ्यांची क्रयशक्ती वाढण्याला मदत होते. ज्या जमिनीमध्ये बियाणे पेरले जाते त्या कोपऱ्याची भाजावळ केली जाते. त्या कोपऱ्यात कवळा फोडून पूर्ण कोपऱ्यात पसरवली जातात. गायरीतील वाळलेले शेण बारीक करून त्यावर पेरले जाते किंवा लेंडी वरती पेरली जाते. त्याचप्रमाणे घराच्या बाजूचा किंवा बागेतील झाडाखाली असलेला पातेरा एकत्र करून तो झापातून घेऊन येऊन वरती टाकला जातो. अशा कामांना सर्रास चाकरमान्यांच्या मुलांना मदतीला घेतले जाते. तशी मुले सुद्धा आनंदाने काम करतात. तेवढीच मदतीस मदत. अधिक उत्साहाने चाकरमान्यांची मुले गावची कामे करीत असतात. कोपऱ्यात कवळा फोडून लावणे, त्यावर आसपासचा पातेरा आणि त्यानंतर गायरीतील वाळलेले शेण, माळावरची गोवरी व लेंडी पेरली जाते. तीन ते चार दिवस चांगली सुकविली जाते. त्यानंतर संध्याकाळच्या वेळेला हवा कमी असेल अशा वेळी आसपासची मोकळी जागा साफ केली जाते. वणवा जावू नये म्हणून त्याची काळजी घेतली जाते. त्यानंतर हवेचा अंदाज घेऊन आग लावली जाते. दुसऱ्या दिवशी सकाळीच येऊन झालेली राख एकत्र केली जाते. जेव्हा मशागतीला सुरुवात करणार त्या दिवशी ती राख कोपऱ्यात पेरली जाते. त्या आधी त्या कोपऱ्यातील न जळालेल्या काट्या व दगड बाजूला काढल्या जातात. म्हणजे साफसफाई केली जाते. जाड काड्या असतील, तर घरी नेल्या जातात, तर दगड कोपऱ्याच्या मेरेला लावले जातात. ही कामे चाकरमान्यांची मुले सुद्धा करताना. बऱ्याच वेळा हात काळे होतात मात्र अशी कामे करणे कष्टाची असतात, असे चाकरमान्यांची मुले म्हणतात. तसेच ही कामे करताना त्यांचा आनंद काही वेगळाच असतो, असे पाहायला मिळते.

## सातारा जिल्हा पोलिस दलातील ११ जणांना महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर :- पंढरपूरचे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांचा सहभाग



साप्ताहिक अनंत विचार वृत्त

राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी २०२३ वर्षातील पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर केले आहेत.त्यामध्ये राज्यातील ८०० अधिकारी व कर्मचाऱ्यांना हे पदक मिळाले असून सातारा जिल्हा पोलिस दलातील ११ जणांचा समावेश आहे. जिल्हा पोलिस दलात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सातारा जिल्ह्यातील दोन अधिकारी आणि ९ कर्मचारी यांना २०२३ वर्षासाठी पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर झाले आहेत. यात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अरुण देवकर तसेच सातारा तालुका पोलिस ठाण्यात कार्यरत असणारे तत्कालीन पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनाही हे सन्मानचिन्ह मिळाले आहे.पोलिस निरीक्षक विश्वजीत घोडके हे सध्या सोलापूर

जिल्हा ग्रामीण पोलिस दलात पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत आहेत. पंढरपूर पोलिस ठाण्याचा चार्ज घेतल्यापासून शहरात शांतता सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी विशेष प्रयत्न करत आहेत. संजय टिळेकर,कमलाकर कुंभार,भरत शिंदे, श्रीधर ठोंबरे आणि नंदकुमार म हाडिक या सहायक पोलिस उपनिरीक्षकांना तर हवालदार महादेव घाडगे, विनोद राजे आणि पोलिस शिपाई बिपीन ढवळे व मंगेश जाधव यांनादेखील पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह मिळाले आहे.

## सोलापूरचे या हंगामातील सर्वाधिक तापमान ४३.७ अंशावर

**सोलापूर –** शहर व परिसरात गेल्या दोन दिवसांपासून तापमानात असह्य वाढ होऊन ते काल रविवारी या वर्षातील सर्वाधिक तापमान ४३.७ अंशांच्या घरात गेले आहे. शुक्रवार दिनांक ५ एप्रिल रोजी या हंगामातील ४३.१ अंश इतके सर्वाधिक तापमान होते. या वाढत्या तापमानामुळे सोलापूरकर अक्षरशः हैराण झाले आहेत. सकाळी नऊपासूनच उकाडा जाणवत असून यात आबालवृद्धांना अधिक त्रास होत आहे. बुधवारी २४ एप्रिल रोजी ४१.२, गुरुवारी ४१.१,शुक्रवारी ४१.२ तर काल शनिवारी,२७ एप्रिल रोजी ४२ अंशांच्या घरात गेले होते.

काल रविवारी शहराचे तापमान यंदाच्या हंगामातील सर्वाधिक म्हणजे ४३.७ अंश सेल्सियस इतके वाढले आहे. गेल्या महिन्यात १६ मार्च रोजी ४०.२ एव्हढे तापमान होते तर २६ मार्च रोजी ४१.४ सर्वाधिक तापमान नोंदले गेले होते. असह्य तापमानामुळे सकाळी नऊ वाजल्यापासूनच अंगाला चटके बसू लागल्यामुळे नागरिकांनी रस्त्यावरून फिरणे टाळले आहे. तर दुपारी बारा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत रस्त्यावरची वाहतूक रोडावली आहे. अंगावर चटके बसू लागल्यामुळे हैराण झालेले नागरिक उन्हात कामे करणे टाळत आहेत. ऊन तथा उष्म्यापासून सुटका होण्यासाठी थंडपेयांचा आधार महत्त्वाचा वाटू लागला आहे. डोक्यावर उन्हाळी टोप्या,खांद्यावर पांढरे गमजे घालणे पसंत केले जात आहे,तर महिलावर्ग तोंडावर स्कार्फ घालून फिरताना दिसत आहेत.

## नवरदेवाने उखाण्यातून घातले मोहिते पाटलांना मत देण्याचे साकडे



**अकलूज –** अकलूज पदमावती नगर येथील कै. नामदेव हरी पवार यांचे नातू व श्री शामराव नामदेव पवार यांचे जेष्ठ सुपुत्र सुधीर व कै,खंडू शंकर वायभासे यांची नात व श्री महादेव खंडू वायभासे केम. ता –करमाळा यांची द्वितीय कन्या स्वप्नाली (आरती )यांचा शुभविवाह रविवारी २८एप्रिल रोजी अकलूज येथील अकलाई मंगल कार्यालय येथे संपन्न झाला.

सध्या लोकसभा निवडणुकीची रणधुम ाळी सुरु असून प्रचाराची जोरदार सुरुवात झाली. अनेक मतदार आपापल्या परीने आपल्या नेत्यांचा प्रचार करीत आहेत.

या विवाह सोहळ्यात देखील याची प्रचिती आली. वर सुधीर पवार यांनी एक अनोखा उखाणा घेतला.

घेऊन हाती विजयाची तुतारी गाढून टाकू गद्दारी स्वप्नालीच नाव घेतो अब की बार ४००पार. पण म ाढ्यात फक्त धैर्यशीलभैय्यांचीच तुतारी लग्न सोहळ्याच्या निमित्ताने उपस्थित असलेल्या मध्ये या उखाण्याचीच चर्चा होती. या अनोख्या उखाण्याची चर्चा दिवसभर अकलूज परिसरात होती. या विवाहसोहळ्यासाठी व वधू वरांना शुभेच्छा देण्यासाठी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान चे सर्व पदाधिकारी, नातेवाईक, मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सत्यम् शिवम् सदा सुंदरम्

### सरश्री



'एकटा जीव सदाशिव...' हे वाक्य आपण सर्वांनीच अनेकदा वाचलं असेल, ऐकलं असेल. याचा शाब्दिक अर्थ घेतला तर तो पुढीलप्रमाणे होईल, 'एकटा मनुष्य सदाशिव अथवा ज्याचं या जगात कोणीही नाही, त्याचाच सदाशिव आहे' मात्र येथे एकटा याचा खरा अर्थ आहे, असा मनुष्य जो सर्वांमध्ये स्वतःला पाहतो, अद्वैत भावात जगतो, त्याला दुसरा कोणी दिसतच नाही. खऱ्या अर्थाने तो सदा'शिवा'च्याच अवस्थेत असतो. जगात एकमेव सत्य, सुंदर जे आहे तोच शिव आहे, शंकर आहे. संपूर्ण ब्रह्मांडात एकच जिवंत महान शक्ती असून तेच सत्य, शिव आहे. त्याच एका महान शक्तीद्वारे संपूर्ण ब्रह्मांड कार्यरत आहे. प्रत्येक सजीव-मृत, सूक्ष्म-स्थूल, प्रकट-अप्रकट तत्त्वांमागे हीच ऊर्जा कार्यरत असते. ही ऊर्जा नेहमी आपल्या मूळ रूपात स्थित असते, स्थिर असते. मात्र तरीही अन्य रूपात ती आभासित होत असतेच. जसं, एखाद्या लेजर शोमध्ये लेजर किरणांद्वारे असं मनोरम दृश्य निर्माण केले जातात, जणू ते खरोखरच सजीव असावेत. पण ती दृश्यं म्हणजे त्या लेजर किरणांचं आभासित रूप आहे, मनुष्य केवळ शब्दांचीच भाषा जाणतो. म्हणून आत्मसाक्षात्कारी संतांनी त्या ऊर्जेला, अनुभवाला आपल्या भाषेनुसार, वातावरणानुसार आणि समजेनुसार वेगवेगळी नावं बहाल केली आहेत. जसं, महातरंग! याच परमसत्याचं शब्दात वर्णन करताना गुरु नानक म्हणतात, 'एक नूर ते सब जग उपजा' अर्थात 'एकाच दिव्य प्रकाशातून संपूर्ण सृष्टीचं सर्जन झालंय.' आदि शंकराचार्य म्हणतात, 'अहम् ब्रह्मास्मि' म्हणजे 'मी तोच ब्रह्म आहे'. वेद-उपनिषदात सांगितलंय, 'तत्त्वमसि', 'तुम्ही तेच आहात', 'सोहम्' (मी तोच आहे), ॐ तत्-सत् (तीच परमशक्ती, ॐ हेच सत्य आहे) सांगण्याचं तात्पर्य, स्वानुभवासाठी भिन्न-भिन्न प्रकारे एकच गोष्ट सांगितली गेलीय. सर्व काही त्या एकामधूनच निर्माण झालंय, मी पण तोच आहे, तुम्हीपण तेच आहात आणि केवळ एकमात्र चेतनाच सत्य आहे. अन्य सगळं खोटं आहे, आभासी आहे, भ्रम

**तेजज्ञान फाउंडेशन**
**9921008060**
**helpdesk@tejgyan.org**

## आदित्य चंद्रकांत पिटले याचे जेइइ मेन्स परीक्षेमध्ये यश



पंढरपूर- वामनराव माने प्रशाला व कला, शास्त्र कनिष्ठ महाविद्यालय, भैरवनाथवाडी येथील शास्त्र विभागाचा विद्यार्थी आदित्य चंद्रकांत पिटले या विद्यार्थ्याने जेइइ मेन्स या परीक्षेमध्ये ९७.१२ टक्के गुण मिळवून यश संपादन केले आहे.

या यशाबद्दल आदित्यचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष ॲड.वामनराव माने, सचिव प्रा.सुभाषराव माने तसेच सर्व संचालक मंडळ सर्व शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले.

हे पत्र मुद्रक सोमनाथ नवनाथ शिंदे यांनी प्रकाशक सचिन हरी आदापुरे व मालक सचिन हरी आदापुरे यांचे करीता दर्लिंग ग्राफिक्स, जुना बस स्टँड शेजारी, दर्शन उद्योग भवन, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथे छापून घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर येथून प्रकाशित केले. संपादक : सचिन हरी आदापुरे, घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर मो.नं.९८५००२७६४३ (या अंकात प्रसिध्द झालेल्या मजकुरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्ष-पंढरपूर)

printed by SOMNATH NAVNATH SHINDE and published by SACHIN HARI ADAPURE and on behalf of SACHIN HARI ADAPURE printed at DARLING GRAPHICS, near old bus stand, darshan udyog bhavan , pandharpur, Dist - Solapur and published by Nath chouk pandharpur Editor : Sachin Hari Adapure, House No 1225, Nath chouk, Pandharpur Mob.9850027643



## आदिनाथ (तात्या) कोंडीबा बारले यांचे निधन

पंढरपूर – येथील मेवा मिठाईचे प्रसिद्ध व्यापारी आदिनाथ (तात्या ) कोंडीबा बारले यांचे बुधवारी दुपारी वृद्धापकाळाने गोविंदपुरा भागातील निवासस्थानी निधन झाले.मृत्यू समई त्यांचे वय ८८ वर्षे होते.

त्यांचे पश्चात पत्नी मुलगा ३ सुना नातवंडे असा परिवार आहे.

# अपघातग्रस्त व्यक्तीला मदत करण्यासाठी गेलेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षकाचा मृत्यू

**पंढरपूर** – अपघातग्रस्त व्यक्तीला मदत करण्यासाठी जात असताना वेगाने जाणाऱ्या कारणे जोरात धडक दिल्याने डोक्याला मार लागून सहाय्यक पोलीस निरीक्षकाचा जागीच मृत्यू.

ही घटना शनिवारी रात्री नऊच्या सुमारास सांगोला–पंढरपूर रोडवरील हॉटेल चंद्रमाला नजीक घडली.

यामध्ये कपिल विठ्ठल सोनकांबळे (वय वर्षे ४२ सध्या पंढरपूर मूळ नांदेड) असे मृत सहाय्यक पोलीस निरीक्षकाचे नाव आहे. घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार कपिल सोनकांबळे हे स्वतः च्या बुलेटवरून पंढरपूरला घराकडे निघाले होते.



दरम्यान वाटेत पंढरपूर रोडवरील हॉटेल चंद्रमाला नजीक अज्ञात वाहनाने मोटरसायकल स्वारास धडक दिल्यामुळे वृद्ध इसम जखमी अवस्थेत रोडवर पडला होता. ही घटना पाहून कपिल सोनकांबळे यांनी दुचाकी रस्त्याच्या कडेला गाडी उभी करून डोक्याचे हेल्मेट काढले व जखमीला मदत करण्यासाठी जात होते. नेमके त्यावेळी सांगोल्याकडून भरधाव वेगाने जाणाऱ्या कारणे त्यांना जोरदार धडक दिल्याने. डोक्याला पाठीमागून मार लागला आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. हि माहिती मिळताच पोलीस प्रशासनातील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. त्यांना उपचाराकरता सरकारी वाहनाने तात्काळ सांगोल्यातील खाजगी रुग्णालयात दाखल केले असता. डॉक्टरांनी उपचारा पूर्वी मृत्यू झाला असल्याचे सांगितले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.

## ए.टी.एस. परीक्षेत गंगाई सपाटे शिक्षण संकुलाचे घवघवीत यश.

पंढरपूर – शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये घेण्यात आलेल्या केंद्रस्तरीय एटीएस परीक्षे पंढरपूर तालुक्यातील गंगाई सपाटे शिक्षण संकुलातील १०० पेक्षा अधिक विद्यार्थी या परीक्षेत प्रविष्ट झाले होते त्यापैकी खालील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

इयत्ता ७वी तील कु.कोमल संतोष राऊत २४२ गुणासह केंद्रात प्रथम,जिल्ह्यात १३ तर राज्यात २० या क्रमांकाने उत्तीर्ण झाली. कु.लक्ष्मी दत्तात्रय राऊत २४० गुणासह केंद्रात द्वितीय,जिल्ह्यात १४ तर राज्यात २१ या क्रमांकाने उत्तीर्ण झाली इयत्ता ६वी कु.आर्या औदुंबर सपाटे २१० गुणासह केंद्रात प्रथम,जिल्ह्यात २४ या क्रमांकाने उत्तीर्ण झाली.कु.श्रावनी अशोक नकाते १९६ गुणासह केंद्रात द्वितीय,जिल्ह्यात ३१ या क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

इयत्ता चौथी कु.युवराज्ञी अतुल डोंगरे २३६ गुणासह केंद्रात द्वितीय जिल्ह्यात २० तर राज्यात २७वा क्रमांक पटकावला.तर इयत्ता १ली तील कु.आरोही सचिन सपाटे हिने ७३ गुणासह केंद्रात तृतीय जिल्ह्यात ८वा तर राज्यात ११वा क्रमांक पटकावला.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रशालेचे मुख्याध्यापक महंमद शेख यांच्या हस्ते गुलाब पुष्प व शैक्षणिक साहित्य देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी सर्व मार्गदर्शक शिक्षक व शिक्षकांचा सुद्धा प्रशालेतर्फे सन्मान करण्यात आला.एटीएस परीक्षा विभाग प्रमुख वैशाली सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली शायबाजबानो शेख,सुवर्णा जाधव,अस्मिता सोनटक्के सुजाता गायकवाड यांनी वरील सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल शिक्षण संकुलाचे संस्थापक अध्यक्ष मा.मनोहरजी सपाटे सचिव अनिल बारबोले प्रशालेचे मुख्याध्यापक महंमद शेख यांना यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व कौतुक केले.

# शेतकऱ्यांचा फायदा झाला तर पशुधनात वाढ होईलः सहआयुक्त डॉ.संतोष पंचपोर

## स्वेरीत 'जागतिक पशुवैद्यक दिना' निमित्त 'तांत्रिक परिसंवाद' व पुरस्कार वितरण कार्यक्रम संपन्न

पंढरपूर– जागतिक पशुवैद्यक दिना' निमित्त ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठान, पंढरपूर व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये 'तांत्रिक परिसंवादा'चे तसेच 'स्व. डॉ. सुहास देशपांडे जीवन गौरव पुरस्कार' व 'स्व. डॉ. चंद्रकांत निंबाळकर उत्कृष्ट पशुवैद्यक पुरस्कार' या उपक्रमांचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी पुणे विभागाचे प्रादेशिक पशुसंवर्धनचे सहआयुक्त डॉ. संतोष पंचपोर हे उपस्थितांना मार्गदर्शन करत होते. अध्यक्षस्थानी पशुसंवर्धन विभाग, सोलापूरचे उपायुक्त डॉ. समीर बोरकर हे होते. दीप प्रज्वलनानंतर तसेच स्व. डॉ. सुहास देशपांडे व स्व. डॉ. चंद्रकांत निंबाळकर यांच्या प्रतिमा पुजनानंतर प्रास्तविकात ज्येष्ठ पशुवैद्यक




प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. विश्वासराव मोरे यांनी 'जागतिक पशुवैद्यक दिना'चे महत्व सांगून कार्यक्रम आयोजिन्याचा हेतू स्पष्ट करून 'ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठान'ची वाटचाल सांगितली. पंढरपूर पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी डॉ.प्रियांका जाधव–कोळेकर यांनी सर्वांचे स्वागत केले. 'तांत्रिक परिसंवाद' मध्ये परभणीच्या पशुवैद्यक महाविद्यालयाचे माजी सहयोगी अधिष्ठाता प्रा. डॉ. नितिन मार्कंडे यांनी 'वंध्यत्व निवारण व व्यवस्थापन' या विषयावर व शिरवळच्या केएनपी पशुवैद्यक महाविद्यालयाचे प्रा. डॉ.विठ्ठल धायगुडे यांनी 'रोगनिदान तपासण्यांचे महत्व' या विषयावर बहुमोल मार्गदर्शन केले. यानंतर महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद, नागपूरचे माजी अध्यक्ष डॉ. दिलीप घोरपडे, पशुसंवर्धन विभागाचे माजी सहआयुक्त डॉ. महेश बनसोडे, जिल्हा पशु सर्वरोग चिकित्सालय, सोलापूरचे सहाय्यक आयुक्त डॉ. भास्कर पराडे व स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी पशुवैद्यक क्षेत्रातील अतुलनीय योगदान पाहून डॉ. दिलीप घोरपडे व डॉ. महेश बनसोडे यांना 'स्व. डॉ. सुहास देशपांडे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले तर डॉ.भाग्यश्री राठोड (दक्षिण सोलापूर), डॉ. विष्णू होळकर (वाघदरी–अक्कलकोट), डॉ. सचिन कंपने (बोरामणी–उत्तर सोलापूर), डॉ.ओम सोनाळे (मोहोळ), डॉ.कैलास कच्छवे (मोडनिंब), डॉ. आर.एन. होळकर (करमाळा), डॉ.पी.टी.मांजरे (जवळगाव–बार्शी), डॉ. रवींद्र बंडगर (मरवडे– मंगळवेढा), डॉ. श्रीकांत सुर्वे (सांगोला), डॉ.अतुल चुकेवार (माळशिरस), डॉ. शामराव वायबसे (वाळवा–सांगली), डॉ. लक्ष्मण गाढवे (आटपाडी–सांगली) या पशुधन विकास अधिकाऱ्यांचा 'स्व. डॉ. चंद्रकांत निंबाळकर उत्कृष्ट पशुवैद्यक पुरस्कार' म्हणून तर डॉ. रविंद्र वर्धमान यांना पशुधन अधिकारी व योगा बाबत जनजागृती केल्याबद्धल विशेष सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी झाला. प्रा. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर संघटनेचे कोषाध्यक्ष डॉ. नंदकुमार होनराव यांनी आभार मानले.

## फलटण येथील बीआरएस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी महायुतीच्या उमेदवारास जाहीर पाठिंबा

फलटण – माळशिरस , नातेपुते , सदाशिवनगर पंचक्रोशीतील बीआरएस पक्षातील विविध सेलच्या पदाधिकाऱ्यांनी विकासकामांना साथ देत खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या विजयासाठी जोरदार हालचाली सुरु केल्या आहे. माढा लोकसभा मतदारसंघाची निवडणूक येत्या ७ मे रोजी होत आहे. यासाठी भारतीय जनता पार्टी महायुतीचे उमेदवार खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना उमेदवारी दिली आहे.

विजयासाठी नातेपुते, माळशिरस सदाशिवनगर पंचक्रोशीतील भाजपच्या निष्ठावतांनी सुरूवातीपासून विजयासाठी कंबर कसली आहे. तर आता बीआरएस चे विविध पदाधिकार्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कार्य तसेच खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी केलेली विकासकामे पाहून देशात भाजपचेच सरकार येणार पुन्हा एकदा नरेंद्र मोदी च पंतप्रधान होणार आहेत. तालुकाध्यक्ष अशोक भोसले व ओबीसी सेलचे अध्यक्ष शंकरराव बनकर यांनी आज खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना पाठिंबा दिला याबद्दल त्यांचे स्वागत फलटण शहर भाजपा अध्यक्ष अनुप शहा , नगरसेवक अजय माळवे , सुधीर अहिवळे , फलटण शहर वैद्यकीय आघाडीचे अध्यक्ष डॉक्टर अनिल श्रीवास्तव यांनी त्यांचे स्वागत करून आभार मानले.

# महिला कर्मचाऱ्यांवरील अन्याय खपवून घेणार नाही : सीईओ मनिषा आव्हाळे ॲक्शन मोडवर

**सोलापूर** – आरोग्य विभागातील महिला कर्मचाऱ्यांच्या गंभीर तक्रारीकडे दुर्लक्ष करणे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले यांना महागात पडणार आहे. अक्कलकोटप्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकारी नवले व अक्कलकोट तालुका वैद्यकीय अधिकारी करजखेडे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी दिले आहेत. दरम्यान,आव्हाळे या चांगल्याच ॲक्शन मोडवर आल्या असून, कोणत्याही महिला कर्मचाऱ्यांवर होणारा मी अन्याय खपवून घेणार नाही, असा पवित्रा त्यांनी घेतला आहे.

अक्कलकोट तालुक्यात आरोग्य विभागात घडलेल्या प्रकरणाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी स्पष्टीकरण दिले आहे. मी येथे खुर्चीवर बसलेली असताना कोणत्याही महिला कर्मचाऱ्यांवर अन्याय झाल्याचे खपवून घेणार नाही,असा इशारा त्यांनी दिला आहे. आरोग्य विभागात घडलेला प्रकार अत्यंत गंभीर आहे. अक्कलकोट तालुक्यातील जेऊर व दुधनी येथील प्रकरणाबाबत डीएचओ नवले व टीपीओ करजखेडे यांच्याकडून खुलासा मागितला आहे. या दोघांनाही याबाबत तत्काळ कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे प्रशासनाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांना आदेश दिले आहेत. महिला कर्मचाऱ्यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या आरोग्य अधिकाऱ्याची गय केली जाणार नाही,असा इशारा त्यांनी दिला आहे. जेऊर येथील प्रकाराबाबत आरोग्य कर्मचारी संघटनेने केलेली तक्रारही प्राप्त झाली आहे. या तक्रारीबाबतही चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आरोग्य विभागातील गोंधळाबाबत लवकरच बैठक घेऊन आढावा घेतला जाईल.

## विधानसभेचे धोरण अस्पष्ट असतानाही घड्याळाचा आताच प्रचार का? मोठी ताकद असतानाही खरे समर्थक शांतच

# राजन पाटील यांच्या भूमिकेमुळेच शिवसेनेचे नेते राजू खरे अलिप्त

**पंढरपूर** – सोलापूर लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार आ. राम सातपुते यांच्या प्रचारातून मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांनी या निवडणुकीत कमळ आणि विधानसभेला घड्याळ असाच प्रचार सुरू केला आहे. यामुळे शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावर निवडणूक लढवू इच्छित असलेले शिवसेनेचे नेते राजू खरे या निवडणुकीत सद्या अलिप्त असल्याचेच दिसून येत आहे.

### विधानसभेसाठी तयारीत असलेल्या कार्यकर्त्यांना लोकसभा निवडणुकीत स्वातंत्र्य

राज्यात शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसची महायुती आहे. त्यामुळे महायुतीमध्ये सर्वानुमते विचार होणे अपेक्षित आहे.सध्या लोकसभा निवडणूक सुरू आहे. विधानसभेसाठी अजून वेळ असतानाही याचं निवडणुकीत पुढची तयारी सुरू आहे. केवळ राष्ट्रवादीचाच उमेदवार आगामी विधानसभेला असेल असेच सांगितले जात आहे. यामुळे शिवसेनेकडून निवडणूक लढविणारे खरे यांची पंचाईत होणार आहे. यामुळे खरे समर्थक अद्यापही शांतच आहेत.

मोहोळ विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी मोठी तयारी खरे यांनी केली आहे. त्यामुळे मोहोळ विधानसभा मतदार संघातील मोहोळ, पंढरपूर आणि उत्तर सोलापूर तालुक्यात कार्यकर्त्यांचे मोठे जाळे आहे. या ताकदीचा उपयोग करून घेण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांनी गोपाळपूर येथील फार्महाऊस येथे येऊन आपल्याला साथ देण्याची विनंती केली आहे. त्यावेळी खरे परिवाराने आपली संस्कृती जपत यथोचित सन्मान केला आहे.

उद्योजक राजू खरे यांनी या लोकसभा निवडणुकीत सध्या कोणतीही भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. खरे



समर्थक यांनी याबाबत कुठेही असल्याचे दाखविले गेले नाही. त्यामुळे या लोकसभा निवडणुकीत कार्यकर्त्यांना मतदान करण्यासाठी स्वातंत्र्य दिल्याचे बोलले जात आहे. याबाबत स्वतः राजू खरे यांचेशी संपर्क साधला असता. मी मागील अनेक वर्ष शिवसेनेचा कार्यकर्ता म्हणून काम करीत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच माझे नेते आहेत. त्यामुळे त्यांचा निर्णय हाच माझा निर्णय असेल असेही सांगितले आहे. या निवडणुकीत आपली भूमिका काय असेल यापेक्षाही आगामी विधानसभा निवडणुकीत आपण मोहोळ मधून निवडणूक लढविणार आहे. हे मात्र पक्के असल्याचे सांगितले. यामुळे या लोकसभा निवडणुकीतील भूमिका आपण आपल्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहचविणार असल्याचे सांगितले आहे.

# विठ्ठल कारखाना वाचविण्यासाठी वाटेल ती किंमत मोजायला तयार - चेअरमन अभिजीत पाटील

साप्ताहिक अनंत विचार वृत्त

**पंढरपूर-** विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांनी आज सोलापूर येथे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन विठ्ठल कारखान्याच्या अडचणी सांगितल्या त्यातून विठ्ठल कारखाना वाचवण्यासाठी अभिजीत पाटील वाटेल ती किंमत मोजण्यासाठी तयार आहेत अशी या ठिकाणी अभिजीत पाटील यांनी बोलताना सांगितले शेतकरी सभासद जगला पाहिजे व सभासदांच्या संसाराची राजकारण जोडून चालणार नाही अशी अभिजीत पाटील यांची या



ठिकाणी भावना व्यक्त केली असता, फडणवीस यांनी लवकरच यातून मार्ग काढू असा शब्द दिल्याचे अभिजीत पाटील यांनी सांगितले..

# घटक पक्षांना विश्वासात न घेतल्याने खासदार निंबाळकर यांच्यावर घटक पक्ष नाराज

नातेपुते - माळशिरस तालुक्यात भारतीय जनता पार्टी माढा लोकसभेच्या मतदान प्रक्रियेत प्रचार यंत्रणेत विश्वासात न घेतल्याने व वरिष्ठ नेत्यांच्या कुठल्याही सभेला निमंत्रण मिळत नसल्याने व प्रचार यंत्रणेत सामील करून घेत नसल्याने मित्र पक्षांच्या नेत्यांमध्ये माढा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या बद्दल नाराजीचा सूर दिसून येत असून नातेपुते येथे मित्रपक्षेतील नेत्यांनी पत्रकार परिषद घेऊन नाराज असल्याच्या भावना व्यक्त केल्या यावेळी शिवसेना शिंदे गट तालुकाप्रमुख सतीश सपकाळ मन मनसेचे माढा लोकसभा अध्यक्ष अप्पासाहेब कर्चे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे नातेपुते शहराध्यक्ष संघर्ष सोरटे आधी मित्र पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

माळशिरस तालुक्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस साहेब प्रचार सभेसाठी येणार असताना सुद्धा आम्ही मित्र पक्षाचे पदाधिकारी असून सुद्धा आम्हाला कोणत्याही प्रकारच्या सूचना किंवा कल्पना दिल्या नाहीत नातेपुते येथे प्रचाराचा नारळ फोडायला सुद्धा पक्ष्याच्या वतीने बोलावले नाही त्यामुळे आम्ही खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्यावर पूर्ण नाराज आहोत - सतीश सपकाळ माळशिरस शिवसेना शिंदे गट तालुकाप्रमुख घटक पक्षांना मान सन्मान मिळत नाही कोणत्याही कार्यक्रमाला बोलाविले जात नाही एखाद्या वरिष्ठ नेता येत असेल तर लोके घेऊन या एवढेच निरोप येतो परंतु कुठल्याही सभेचा कार्यक्रमाचा निरोप पोहोचत नाही आमचे राष्ट्रीय नेते राज साहेब ठाकरे यांनी बिनाशिअर्थ पाठिंबा दिला आहे प्रचार यंत्रणेच्या कार्यक्रमात सामील करून घेऊन मानाची खुर्ची मिळाली पाहिजे आपले विचार सांगण्याची संधी मिळाली पाहिजे अद्याप पर्यंत आमच्यापर्यंत पत्रिकेही मिळाले नाहीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस येत असून त्यांच्या सभेला आम्ही कसे जाणार आमचे कार्यकर्ते कसे जाणार कोणाला बोलवले आहे अशा प्रकारे कसलेही निरोप खासदार निंबाळकर यांच्याकडून होताना दिसत नाहीत या ठिकाणी शिवसेना शिंदे गट असेल आरपीआय असेल मनसे असेल यांनी काम करायची खूप इच्छा आहे नरेंद्र मोदी साहेब देशात पंतप्रधान पुन्हा झाले पाहिजेत परंतु प्रचार यंत्रणेबाबत आम्हाला काहीच माहिती मिळत नाही त्यामुळे आमची कार्यकर्ते नाराज होत आहे त्यामुळे हा प्रचार आम्ही थांबवणेच्या मानसिकतेत आहे आम्ही आमच्या नेत्याचा आदेश पाळू आम्ही बीजेपीला मतदान करणार पण त्यांनी जर आम्हाला सिस्टम मध्ये नाही घेतलं तर आम्ही आमच्या पद्धतीने काम करू - आप्पासाहेब कर्चे मनसे माढा लोकसभा अध्यक्ष

आमचे राष्ट्रीय नेते रामदास आठवले साहेब यांच्या आदेश आला की तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांना पंतप्रधान करायचे आहे त्यानुसार रिपब्लिकन पक्षांनी तळागाळातील मतदारापर्यंत पोहोचून कमळ फुलवायचे असल्याचा प्रचार सुरू केला आहे परंतु मित्रपक्ष या नात्याने भाजप प्रचार यंत्रणेमधून आम्हाला लातडले गेले आहे आम्ही या भाजपच्या सिस्टीमचा तीव्र शब्दात निषेध करतो आज आम्ही तळागाळापर्यंत कामे करून सुद्धा आमच्या मताला किंमत दिली जात नाही आम्हाला या ठिकाणी कुठल्याही यंत्रणेत विश्वासात घेतले जात नाही जी परिस्थिती आमच्या बाबतीत आहे तीच परिस्थिती इतर घटक पक्षाच्या बाबतीतही आहे नातेपुते परिसरामध्ये प्रचाराचा नारळ फोडला असताना सुद्धा आम्हाला भाजपच्या एकाही कार्यकर्त्यांनी या प्रचार यंत्रणेस बोलवले नाही त्यामुळे या प्रचार यंत्रणेतून भाजप आम्हाला बाहेर फेकत आहे

# अकलूज चौकात देवेंद्र फडणवीसांनी रणजितसिंह मोहिते- पाटलांचा फुलांचा गुच्छ स्वीकारला नाही.

## गद्दारांना माफी नाही, रणजितसिंह निंबाळकरांचा हल्लाबोल.

**पंढरपूर -** एवढी मदत करुनही गद्दारी केली.अकलूज चौकात फुलांचा गुच्छ घेवून रणजितसिंह मोहिते पाटील स्वागतासाठी उभे होते, पण देवेंद्र फडणवीस यांनी तो स्वीकारला नाही. ते थेट सभेकडे आले. गद्दारांना माफी नाही आता त्याची दखल पक्ष घेणार नाही, असे माढ्याचे महायुतीचे उमेदवार रणजितसिंह निंबाळकर म्हणाले.

अकलूज येथे महायुतीची सभा पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी निंबाळकरांनी मोहिते पाटलांवर चौफेर टीका केली.

रणजितसिंह निंबाळकर म्हणाले, एक एक रुपयाचा हिशोब घेणार आहे. मी कोणाच्या बापाला भित नाही. त्यांच्या बापाला बारामतीकरांना भित नाही. काय ताकद लावायची ती लावा तुम्हाला पाडणार आहे. चार तारखेला रिझल्ट काय होईल ते कळेल, असंही रणजित निंबाळकर यांनी म्हटलं. माळशीरस तालुक्याचे पालकत्व आम्ही घेतलं आहे. धवलदादांच्या घोषणा देणाऱ्यांना सांगायचे आहे की, लवकरच धवलदादा आपल्यासोबत येणार आहेत, असंही निंबाळकर यांनी स्पष्ट केलं. मोदी ३० तारखेला आपल्याला भेटण्यासाठी येणार आहेत. मोदी सरकारच्या योजनाचा लाभ न मिळालेला माणूस मला आणून दाखवा. शरद पवारांनी जातीभेद निर्माण केला. धनगर समाजाला पेटवण्याचे काम शरद पवारांनी केलं. आण्णासाहेब पाटील शरद पवारांकडे गेले होते. म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण दिलं नाही, तर मी आत्महत्या करेन. त्यांनी आत्महत्या केली, पण आरक्षण मिळालं नाही. शरद पवार गद्दार आहेत. उद्धव ठाकरेही तसेच आहेत. पाणी बारामतीला घेऊन गेले. माझ्यासमोरचा उमेदवार गद्दार आहे. शरद पवार गद्दार आहेत. उद्धव ठाकरे गद्दार आहेत, अशी टीकाही रणजितसिंह निंबाळकर यांनी केली आहे.

# माळशिरसमध्ये आज पंतप्रधान मोदी यांची सभा

माळशिरस- माढा लोकसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्ष व महायुतीचे उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची येथे जाहीर सभा मंगळवारी दि.३० रोजी सकाळी साडे नऊ वाजता आयोजित करण्यात आली आहे. या सभेस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, राम सातपुते, जयकुमार गोरे, समाधान आवताडे, शहाजी पाटील, हे आमदार, माजी आमदार प्रशांत परिचारक, कल्याणराव काळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सभेस केंद्रीय मंत्री रामदास आठवले, आमदार गोपीचंद पडळकर, माजी मंत्री महादेव जानकर, आमदार प्रसाद लाड उपस्थित राहणार आहेत. माढा लोकसभा मतदारसंघातील बदलत्या राजकीय परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जाहीर सभेकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे.

# कोळी समाज कधीच भाजपाला साथ देणार नाहीत

## गणेश अंकुशराव यांची माहिती

पंढरपूर: कोळी महासंघ म्हणजे सोलापूर जिल्ह्यातला कोळी समाज नव्हे. जिल्ह्यातल्या कोणत्याही समाज बांधवांना विश्वासात न घेता लोकसभा निवडणुकीत भाजपाला पाठिंबा देणारे रमेश पाटील कोण? ते सोलापूर जिल्ह्यातल्या अथवा महाराष्ट्रातल्या आदिवासी कोळी समाजाचे मालक नाहीत.'' असा खणखणीत इशारा महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी कोळी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष आ.रमेश पाटील यांना दिला आहे. कोळी महासंघाचे अध्यक्ष आमदार रमेश पाटील हे २५ एप्रिलला सोलापूरमध्ये आले तेंव्हा त्यांनी समाजाच्या प्रश्नाचे ज्ञान नसणाऱ्या एका अज्ञानी कार्यकर्त्यांच्या माध्यमातुन कार्यक्रम घेऊन भाजपाचे उमेदवारास लोकसभा निवडणुकीसाठी पाठिंबा जाहीर केला आहे. आमदार रमेश पाटील यांनी कोळी समाजाला जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणत्राचा प्रश्न सोडवतो म्हणून भाजपाकडून आमदारकी पदरात पाडून घेतली आहे. प्रश्न मात्र सोडवला नसल्यामुळे फसगत झालेली आहे. त्यांना समाज नेता मानत नाही. समाजाच्या प्रश्नाविषयी त्यांनी वाच्यताही केलेली नाही. जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र कोळी जमातीच्या अस्मितेचा विषय आहे अशा संवेदनशील प्रश्नावरती त्यांनी वाच्यताही केलेली नाही. जिल्ह्यातल्या कोळी समाज बांधवासह सबंध महाराष्ट्रातील कोळी समाजाच्या मतदार बंधु-भगिनींनी भारतीय जनता पार्टीला मतदान करू नये. असे आवाहन गणेश अंकुशराव यांनी केले आहे.

# जन्मजात व्यंग निदान शिबिरात ५१ बालकांची तपासणी

पंढरपूर - बालकातील जन्मजात दोष, व्यंग या आजारावरील निदान व उपचार शिबिर नवजीवन हॉस्पिटल, पंढरपूर येथे संपन्न झाले. यात जन्मजात व्यंग असलेले ५१ बालकांची तपासणी करण्यात आली असून त्यांच्या पालकांना समूपदेशन व पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

हे शिबिर उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर, स्पायना बायफिडा फाउंडेशन मुंबई , नवजीवन हॉस्पिटल,अग्रज हॉस्पिटल, स्त्री आरोग्य तज्ज्ञ संघटना व पंढरपूर आयएमए यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. शिबिरासाठी मुख्य पाहुणे म्हणून सिने अभिनेत्री वर्षा उसगावकर या उपस्थित होत्या. तर डॉ संतोष करमरकर हे अध्यक्षस्थानी होते. तसेच डॉ. स्नेहा सावंत, संचालक उमा काळेकर, डॉ. शीतल शहा, डॉ. महेश तळपल्लिकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, डॉ. सुनील कारंडे



यां.ची प्रमुख उपस्थित होती. त्याचबरोबर आयएमए हॉल येथे . सर्व डॉक्टरांसाठी एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रामध्ये डॉ. सुमित चमारिया, डॉ सुदेश दोशी, डॉ.मंदार सोनवणे तसेच पंढरपूरमधील नामवंत डॉक्टरांनी व राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमातील वैद्यकीय अधिकारी यांनी सहभाग नोंदवला. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा रुग्णालयाचे बाह्य संपर्क अधिकारी श्रीकांत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.महेश सुडके व राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.कुलदीप डोके यांनी विशेष परिश्रम घेतले. डॉ.सुदेश दोशी यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. सूत्रसंचालन पुरुषोत्तम कदम यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. सुधीर असबे यांनी मानले.

# फुलचिंचोली येथे कायदेविषयक शिबिर संपन्न

पंढरपूर.- राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या किमान समान शिबिर कार्यक्रमा अंतर्गत तालुका विधी सेवा समिती पंढरपूर व अधिवक्ता संघ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, फुलचिंचोली येथे जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे यांच्या मार्गदर्शनाखाली व दिवाणी न्यायाधीश पी. बी. घोरपडे यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक पाणी दिवस व जागतिक वसुंधरा दिनाविषयी जनजागृतीपर कार्यक्रम तसेच कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर संपन्न झाले.

जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्ष न्या. पी. बी. घोरपडे यांनी शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थींना पिण्याच्या पाण्याचे महत्व पटवून दिले. तसेच पर्यावणाविषयी जनजागृती करुन, त्याबाबत अंमलात आलेल्या कायद्या विषयी मार्गदर्शन केले. तसेच वसुंधरा दिनानिमित्त प्रत्येक विद्यार्थी किमान दोन झाडे लावावी, असे आवाहनही केले. प्रास्ताविक अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. अर्जुन पाटील यांनी तर सूत्रसंचालन ॲड. राहुल बोडके यांनी केले. आभार उपाध्यक्ष ॲड. शशिकांत घाडगे यांनी मानले. यावेळी सचिव ॲड. शक्तीमान माने, ॲड.व्ही. एम. सरवळे, ॲड. सागर गायकवाड, गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे, शाळेचे मख्याध्यापक तुकाराम कांबळे तसेच न्यायालयीन कर्मचारी के.के.शेख, बी.एस.गोरट्याल, विवेक कणकी तसेच संबधित शाळेचे शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सातारा- पंढरपूर रेल्वे दररोज सोडण्याची मागणी

सांगोला- सातारा- सांगोला- पंढरपूर -दादर ही एक्सप्रेस रेल्वे सध्या आठवड्यातील तीन दिवस असून सदर रेल्वे ही दररोज करावी अशी मागणी शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राम करण यादव यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

मुंबई रेल्वे ज्या दिवसापासून सुरू केली आहे, त्या दिवसापासून या रेल्वेस कवठेमहंकाळ, ढालगाव, जत रोड, म्हसोबा डोंगरगाव, सांगोला या रेल्वे स्टेशनवरून प्रवाशांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. आठवड्यातील तीन दिवस या रेल्वेस आरक्षण करिता प्रतीक्षा सुरू असून सर्वसाधारण डब्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्रवाशांची गर्दी होत आहे. त्यासाठी सदर गाडीस आणखीन तीन सर्वसाधारण डबे जोडावेत त्यामुळे रेल्वेच्या उत्पन्नातही वाढ होईल व प्रवाशांची सोय होईल याचा विचार रेल्वे मंडळाने करावा अशी मागणी करण्यात आली आहे. उन्हाळा सुट्टीमुळे प्रवासात मोठ्या प्रमाणात वाढ झालीच आहे. परंतु या भागातून वर्षाचे ३६५ दिवस १५ ते २० ट्रॅव्हल्स दररोज मुंबईला जातात. सदर गाडी दररोज सुरू झाल्यास मुंबईतील नागरिकाबरोबर दुष्काळी पट्ट्यातील नागरिकांची सोय होईल. कोरोनापूर्वी विजापूर मुंबई सुपरफास्ट एक्सप्रेस धावत होती ती बंद करण्यात आली असून त्याचा रेक उपलब्ध असून उर्वरित तीन दिवसांकरिता सातारा पंढरपूर-दादर -सातारा या मार्गावर रेक वापरल्यास आठवड्यातील सगळे दिवस मुंबईला जाण्याकरिता अल्प खर्चात मोठी सोय होईल.